भारताकडून नेपाळला बचाव व मदतकार्याची निरंतर साथ

मानवतावादी मदत घेऊन जाणारे भारतीय वायुदलाचे पाचवे विमान आज काठमांडू येथे पोहोचले. या विमानातून सुमारे 5.5 टन वैद्यकीय साहित्य पाठविण्यात आले असून, त्यामध्ये अँटीबायोटिक्स, वेदनाशामके, सर्जिकल वस्तू आणि इतर अत्यावश्यक औषधांचा समावेश आहे. या विमानातून 6 टनांहून अधिक बचाव साहित्य घेऊन 11 सदस्यीय विशेष तज्ज्ञ पथकही नेपाळमध्ये दाखल झाले आहे. मदतीच्या या नवीन खेपेसह भारताने आतापर्यंत नेपाळला सुमारे 74 टन मदत साहाय्य पोहोचवले आहे.

2. नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुराच्या पार्श्वभूमीवर बचावकार्य सुरूच आहे. आजपर्यंत एकूण 166 भारतीय नागरिकांची सुटका करण्यात आली असून, त्यापैकी 03 नागरिकांची आज सुटका करण्यात आली आहे. तीर्थयात्रा किंवा इतर कारणांसाठी तिबेट स्वायत्त प्रदेशाला भेट देणारे एकूण 410 भारतीय नागरिक आज चीनमधून बाहेर पडले आहेत.

3. भारतीय बचाव पथक : भारतीय बोगदा बचाव पथकाने आज आपला तळ त्रिशुली येथून स्याब्रुबेसी येथे हलवला. यामुळे बचावकार्य सुरू असलेल्या चिलिमे येथे पोहोचण्यासाठी लागणारा वेळ कमी होण्यास मदत होईल. नेपाळी लष्कराच्या सहकार्याने, पथकाने चिलिमे येथे शोधकार्य सुरू ठेवले आहे. बोगद्याच्या आत सगळीकडे चिखल आणि अडथळे असतानाही पथक आज सुमारे 100 मीटर पुढे जाण्यात यशस्वी ठरले. शोध व बचावकार्याला गती देण्यासाठी, बोगद्यापर्यंत पोहोचण्यासाठी तात्पुरता रस्ता तयार करण्याच्या शक्यतेचा आढावा घेण्यात आला, ज्यामुळे अधिक अवजड उपकरणांचा वापर करणे शक्य होईल. आज भारतातून दाखल झालेले 11 बचाव तज्ज्ञ विशेष उपकरणांसह त्रिशुली बाजारच्या जवळ पोहोचले असून, नेपाळी लष्कराच्या समन्वयाने ते उद्यापासून बचावकार्य सुरू करतील, अशी अपेक्षा आहे.

4. भारतीय फॉरेन्सिक्स पथक : भारताकडून पाठविण्यात आलेले फॉरेन्सिक्स पथक सध्या काठमांडू येथील दोन प्रयोगशाळांमध्ये नेपाळमधील तज्ज्ञांच्या सहकार्याने DNA नमुन्यांची तपासणी करण्याचे व विश्लेषणाचे काम करत आहे.

नवी दिल्ली

02 सप्टेंबर 2026